नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३०१ Issue - 301 | वार सोमवार दि. २३ मार्च २०२६ Blow- Monday Date 23 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# हर्षवर्धन सदगीर ठरला महाराष्ट्र केसरी




## महेंद्र गायकवाड उपमहाराष्ट्र केसरी; हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यातील वाघोली येथे ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांनी केले होते. शालेय शिक्षण मंत्री दादा साहेब भुसे आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे याच्या उपस्थितीमध्ये फायनल कुस्ती लावण्यात आली होती. फायनलमध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने ४-३ ने विजय मिळवला. लाल कॉस्ट्यूममध्ये हर्षवर्धन सदगीर आणि निळ्या कॉस्ट्यूममध्ये महेंद्र गायकवाड खेळत होता. नाशिकला त्याच्या रूपाने दुसरी महाराष्ट्र केसरीची गदा मिळाला आहे. तर हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला आहे.

सहा मिनिटांचे दोन राऊंड असतात, त्यामधील पहिल्या राऊंडमध्ये दोघांनी एक एक गुण घेतला होता. पहिल्या राऊंडमध्ये गुणांची बरोबरी होती. दुसऱ्या राऊंडमध्ये दोघेही आक्रमक झाले होते. शेवटच्या दीड मिनिटांमध्ये तीन गुण मिळवत सदगीरने आघाडी घेतली. गायकवाडनेही तीन गुण मिळवले पण वेळ संपल्याने तो पराभूत झाला.

हर्षवर्धन सदगीर याने गादी विभागाच्या अंतिम फेरीमध्ये सोलापूर शहरच्या जयराम पाटील याला पराभूत केले होते. अंतिम फेरीमध्ये १०-० ने हर्षवर्धन याने एकहाती विजय मिळवला होता. उपांत्य फेरीमध्ये हर्षवर्धन सदगीर याने पृथ्वीराज पाटील याचा पराभव केला होता. हर्षवर्धन सदगीर याने याआधी २०२०चा महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला होता. त्यावेळी त्याने वेताळ शेळकेला पराभूत करत पहिल्यांदा किताब पटकावला होता. त्यानंतर हर्षवर्धन याने सहा वर्षांनी फायनलपर्यंत कमबॅक करत विजेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरले.

महेंद्र गायकवाड याने माती विभागामध्ये चपळ चिता म्हणून देशभर प्रसिद्ध असलेल्या सिकंदर शेखला ३-०ने पराभूत केले होते. पहिल्या राऊंडमध्येच त्याने सिकंदरवर आक्रमण चढवलं होतं. सिकंदरसारख्या तगड्या मल्लाला त्याने एकही गुण घेऊन दिला नाही. त्याआधी झालेल्या उपांत्य फेरीत महेंद्र गायकवाड याने सोलापूरच्या रविराज चव्हाण याला पराभूत केले होते. रविराजचा महेंद्रने १०-० ने पराभव करत अंतिम फेरी गाठली होती.

महाराष्ट्र केसरी २०२६ चा विजेता हर्षवर्धन सदगीर याला मानाची गदा, फॉर्च्युनर कार आणि पाच लाख मिळणार आहे. तर उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाडला स्कॉर्पिओ आणि चार लाखांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. १८ बुलेटचही वजनी गटातील विजेत्यांना देण्यात आल्या आहेत. त्यासोबतच ८४० खेळाडू २०० पंच आणि खेळाडूंना ट्रॅक सूट आणि खेळाडूंना ड्राय फूटचा खुराक आयोजकांकडून देण्यात आला.

## नवतेजस्विनी महोत्सव : महिला बचत गटांच्या उत्पादनांचे भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा २३ ते २५ मार्च दरम्यान होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : महिला आर्थिक विकास महामंडळ (मावीम), जिल्हा कार्यालय सोलापूर यांच्या वतीने मावीमच्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. २३ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत यशराज लॉन्स, जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, सोलापूर येथे नवतेजस्विनी महोत्सव या नावाने महिला बचत गटांच्या उत्पादनांचे जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते नव तेजस्विनी महोत्सवाचे उद्घाटन होणार**

या महोत्सवाचे उद्घाटन मा. कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या शुभहस्ते होणार असून मा. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) सोलापूर, कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर, विलास बच्चे, विभागीय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे विभाग, सिद्धराम माशाळे, विभागीय व्यवसाय सल्लागार माविम, चंद्रशेखर जगताप, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर तसेच इतर मान्यवर प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

तीन दिवसीय या महोत्सवामध्ये महिला बचत गटांचा सन्मान समारंभ, शासनाच्या विविध योजनांची माहिती, विविध विषयांवरील चर्चा सत्रे व मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे ६० ते ७० महिला बचत गटांचे स्टॉल येथे उभारण्यात येणार आहेत.

या प्रदर्शनात महिलांनी तयार केलेली विविध दर्जेदार व घरगुती उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील. यामध्ये घरगुती मसाले, हळद पावडर, पापड, लोणची, शेवया, सांडगे, कुरडया, लाल व काळे तिखट, घाण्याचे तेल, दुग्धजन्य पदार्थ, ज्वारी-बाजरीच्या भाकऱ्या, सोलापुरी शेंगदाणा चटणी, लाडू, चिवडा, विविध धान्ये, हस्तकला साहित्य, कपडे, बॅगा, इमिटेशन ज्वेलरी, सौंदर्य प्रसाधने आदींचा समावेश आहे.

तसेच माविम अंतर्गत स्थापित महिला शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत सेंद्रिय भाजीपाला, फळे, कडधान्ये, ज्वारी, बाजरी, मका, सेंद्रिय गूळ, मध, मोरिंगा पावडर आदी उत्पादनेही विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. विविध खाद्यपदार्थांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रदर्शनास मोठ्या संख्येने भेट देऊन ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांची खरेदी करून त्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावावा, असे आवाहन मावीमचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री. एम. एस. पटेल यांनी केले आहे.

## ईदनिमित्त भेटीसाठी निघालेल्या कारचा अपघात; एकाच कुटुंबातील चौघांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परभणी : जिल्ह्याच्या जिंतूर चारठाणा महामार्गावर टेम्पो ट्रॅव्हलर आणि कारची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघाताची घटना घढली. या अपघातात एकाच कुटुंबातील ४ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोरा आली आहे. वसमत येथील सय्यद कुटुंब हे कारने ईदनिमितच्या भेटीसाठी मंठ्याला त्यांच्या नातेवाईकांकडे जात होते, यावेळी याच मार्गावर मंठ्याकडून जिंतूरकडे येणाऱ्या टेम्पो ट्रॅव्हेलरची आणि कारची समोरा समोर जोरदार धडक बसली. ही धडक एवढी जोरात होती की कार अक्षरशः रस्त्याच्या बाजूला गेली. अपघाताची ही घटना सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास घडली.

जिंतूर-चारठाणा महामार्गावरील या भीषण दुर्घटनेत कारमधील सय्यद इस्माईल सय्यद मेहबूब, सय्यद सुमय्या अझर अली, अझर मेहमूद आणि ७ वर्षांची सय्यद उपाध सय्यद या ४ जणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, चार जणांच्या निधनाने जिंतूर परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत पंचनामा केला आहे.



## नाशिक भोंदूबाबा प्रकरण! विधानसभेत स्थगन प्रस्ताव आणणार, यामध्ये मंत्रालयातील अधिकारीही सहभागी, नाना पटोलेंचा गौप्यस्फोट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरुन राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. राजकीय नेते ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. अशोक खरात प्रकरणी उद्या आम्ही विधानसभेत स्थगन प्रस्ताव आणणार असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. खरात प्रकरणी राज्य सरकारनं खुलासा केला पाहिजे. महिला असल्यानं रुपाली चाकणकरांना टार्गेट केल्या जातंय का? मंत्र्यांचे ही राजीनामे घेतील का? असा सवाल पटोलेंनी केला आहे. मंत्रालयातील अधिकाऱ्यांचाही यामध्ये सहभाग असल्याचा गौप्यस्फोट नाना पटोलेंनी केला.



रुपाली चाकणकर एक महिला असल्याने त्यांना टार्गेट केलं जात आहे का? खरात त्यांच्यासोबत देशाचे गृहमंत्री अमित शाह आणि राज्यातील अनेक मंत्र्यांचे फोटो, व्हिडिओ समोर येत आहेत. त्यांच्यावर सुद्धा आता कारवाई होणार का? असा प्रश्न नाना पटोले यांनी उपस्थित केला. मंत्रीच नाहीतर खरातच्या प्रकरणामध्ये मंत्रालयातील अनेक अधिकारी सुद्धा सहभागी असल्याचा गौप्यस्पोट नाना पटोले यांनी केला आहे. मागच्या अधिवेशनामध्ये सुद्धा मी नाशिकचाच मुद्दा घेतला होता. आता खरात कोण आहे, ते समोर आलं आहे. राज्याचे मुख्यमंत्री हेच गृहमंत्री असताना त्यांनी सांगितली होती, अशी कुठलीही घटना घडली नाही. खरात नव्हे तर, नाशिकमध्ये आणखी एक आहे ज्यामध्ये काही अधिकारी, मंत्री सुद्धा सहभागी आहेत. ज्या नाशिकमध्ये महाकुंभ होत आहे तिथं अशी घटना घडते आणि यात महाराष्ट्र बदनाम होत असल्याचे पटोले म्हणाले.


मागच्या वेळेस मी विधानसभेत पेनड्राईव्ह दिला होता. मात्र, तो मुख्यमंत्र्यांनी का लपवला? प्रकरण तेव्हाच उघडकीस आले असते. या प्रकाराचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अगदी तीन दिवसातच एसटी स्थापन केली. एसटीची मागणी कुणीही केलेली नसताना राज्य सरकारने एसटी स्थापन का केली? या संपूर्ण प्रकरणातच्या संदर्भात आम्ही उद्या विधानसभेत स्थगन प्रस्ताव आणून राज्य सरकारला खुलासा मागणार आहोत. राजीनामा वेळ आली तर सरकारला या प्रकरणात राजीनामा सुद्धा द्यावा, लागेल असा थेट निशाणा नाना पटोलेंनी लगावला.

**मंत्री छगन भुजबळ यांची माहिती; आता हॉटेल, उपहारगृहांना ५० टक्के गॅसचे वाटप**

## राज्यातील हॉटेल, उपहारगृहांना २० टक्के गॅस पुरवठा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अमेरिका, इस्त्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धामुळे संपूर्ण जगावार तेल आणि गॅस टंचाईचे संकट गडद झाले आहे. या युद्धामुळे भारतातील गॅसचा साठा पाहता सरकारने केवळ घरगुती सिलेंडरचे उत्पादन आणि वितरण करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना दिले होते. केंद्र सरकारने सर्व उद्योगधंद्यांना गॅसचं वितरण करणं काही काळासाठी थांबवलं होतं. पण आता सरकारकडून परत गॅसचे वितरण केले जात आहे. दुसरीकडे गॅसचे वितरण बंद झाल्यामुळे राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहार गृह ठप्प झाले होते. पण राज्यातील हॉटेल व्यावसायिकांना दिलासा देणारं वृत्त समोर आलं आहे. केंद्र सरकारने



याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील हॉटेल, उपहारगृहांना आता २० टक्के गॅस पुरवठा होणार आहे. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी याबाबत माहिती दिली आहे. राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया-दुग्ध व्यवसाय, राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स यांच्यासाठी २० टक्के एलपीजी पुरवठा करण्याचे केंद्राचे निर्देश असल्याची माहिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. त्यामुळे व्यापारी एलपीजीच्या वाटपाबाबत केंद्राच्या निर्देशामुळे हॉटेल चालकांना दिलासा मिळणार आहे.

केंद्र सरकारकडून काल एक पत्र राज्य सरकारला प्राप्त झालेलं आहे. त्या पत्राद्वारे भारत सरकार पेट्रोलिय आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाकडून व्यापारी डझत्रःच्या वाटपाबाबत सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेश यांना सूचना दिल्या आहेत. १८ मार्च २०२६ च्या केंद्र सरकारच्या पत्राप्रमाणे झछत्रः विस्तारासाठी व्यवसाय सुलभता सुधारण्याच्या आधारे राज्याला आधीच सुरुवातीला २० आणि नंतर १० असे ३० टक्के वाटप मंजूर करण्यात आले आहे.

आता २३ मार्चपासून पुढील सूचना येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण वाटप ५० टक्के होईल, असं मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं.

याचाच अर्थ पूर्वी जितके मिळत होतं त्याच्या ५० टक्के हा कोटा आहे. पण या वाटपासाठी काही शर्थी दिलेल्या आहेत. अतिरिक्त २० टक्के वाटप हे हॉटेल, ढाबे, उपहारगृह, औद्योगिक कॅन्टीन, अन्न



प्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनांद्वारे चालवण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, सामूदायिक स्वयंपाक घरे, स्थलांतरीत मजुरांसाठी पाच किलो ऋढ्ड अशारितेने वाटप करुन त्याचा गैरवापर होणार नाही याची खात्री करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, असं पत्रात म्हटलं आहे, अशी माहिती भुजबळांनी दिली.

इतर व्यापारी आणि औद्योगिक ग्राहकांना ५० टक्के डझत्रः मिळवण्यासाठी पात्र होण्यासाठी तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणं आवश्यक आहे. तेल विपणन कंपन्यांनी ग्राहकांच्या व्यवसाय क्षेत्राचे आणि डझत्रःच्या वार्षिक आवश्यकतेची नोंद स्वतंत्र डेटाबेसवर ठेवावी. सर्व व्यापारी, औद्योगिक डझत्रः ग्राहकांना एकूण ५० टक्के वाटपातून डझत्रः मिळवण्यासाठी पात्र होण्यापूर्वी त्यांच्या शहरातील, जिल्ह्यातील सिटी गॅस डिस्ट्रब्युटर्सकडे झछत्रः साठी अर्ज करणं आणि ते प्राप्त करण्याच्या सज्जतेसाठी आवश्यक आहे. असं करणं बंधनकारक आहे, असं केंद्र सरकारच्या पत्रात नमूद असल्याचं छगन भुजबळ यांनी सांगितलं.

## संपादकीय....

### महाराष्ट्र केसरी

पुण्यातील वाघोली येथे ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांनी केले होते. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे याच्या उपस्थितीमध्ये फायनल कुस्ती लावण्यात आली होती. फायनलमध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने ४-३ ने विजय मिळवला. नाशिकला त्याच्या रूपाने दुसरी महाराष्ट्र केसरीची गदा मिळाला आहे. तर हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला आहे. हर्षवर्धन सदगीर याने गादी विभागाच्या अंतिम फेरीमध्ये सोलापूर शहरच्या जयराम पाटील याला पराभूत केले होते. अंतिम फेरीमध्ये १०-० ने हर्षवर्धन याने एकहाती विजय मिळवला होता. उपांत्य फेरीमध्ये हर्षवर्धन सदगीर याने पृथ्वीराज पाटील याचा पराभव केला होता. हर्षवर्धन सदगीर याने याआधी २०20चा महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला होता. त्यावेळी त्याने वेताळ शेळकेला पराभूत करत पहिल्यांदा किताब पटकावला होता. त्यानंतर हर्षवर्धन याने सहा वर्षांनी फायनलपर्यंत कमबॅक करत विजेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरले. होतं. सिकंदरसारख्या तगड्या मल्लाला त्याने एकही गुण घेऊन दिला नाही. त्याआधी झालेल्या उपांत्य फेरीत महेंद्र गायकवाड याने सोलापूरच्या रविराज चव्हाण याला पराभूत केले होते.

## गुरुजींच्या मानगुटीवर टी.ई.टी सक्तीची.!!

लातूर : प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे, मानवाला जीवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजेसारखीच महत्त्वाची गरज म्हणजे शिक्षणा आपले राष्ट्र प्रगतीपथावर घेऊन जात असताना देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी धडपड करणारा शिल्पकार म्हणजे शिक्षकः

आपल्या देशात अनेक समाजसुधारक झाले. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक, आगरकर, वि. दा. सावरकर, गोविंद रानडे, डॉ. आनंदीबाई जोशी, सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, या सर्वांनी देशात शैक्षणिक क्रांतीचे चाक फिरविले. सामान्यातला सामान्य माणूस शिक्षण घेतल्याने या देशातील उच्च पदावर जाऊ शकतो हे संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सिद्ध करून जगाला दाखवून दिले, जगात सर्वात श्रेष्ठ राज्यघटना ही आमच्याच देशाची आहे.


देशाच्या प्रगतीमधो शिक्षक अविरतपणे झटणारा एक घटक आहे. देशाला प्रगतीपथावर घेऊन जात असताना चार भिंतीत देशाचे भविष्य घडविण्याचे काम करणारा घटक माणजे शिक्षक .देशाच्या सर्वोच्य राष्ट्रपती पदावर डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन हे सुद्धा एक शिक्षकच होते. सावित्रीबाई फुले या उपेक्षितांच्या, स्त्रियांच्या, दुबळ्यांच्या माता सुद्धा एक शिक्षिका होत्या हे विसरून चालणार नाही. बदलणारे विचार प्रवाह वेळेनुसार मान्य करावे लागतील मात्र त्या विचारप्रवाहात खोडसाळपणा असेल तर का मान्य करायचे हा सुद्धा एक तात्विक प्रश्न आहे.

आज महाराष्ट्रातच नव्हे तर देशात सीटीईटी/ टीईटी नावाची परीक्षा सप्टेंबर २५ पासून लागू करण्याचा जाचक निर्णय सरकारने घेतला आहे. १९९० पासून आजतागायत काम करणाऱ्या शिक्षकांना सुद्धा ही परीक्षा द्यावी लागणार आहे. यात तडजोड नाही असेही सांगितले गेले आहे. शिक्षणक्षेत्रात बदल म्हणून ही परीक्षा झाली हे ही मान्य करू. परंतु ज्यावेळेस शिक्षक म्हणून रुजू होत असताना पुणे निवड मंडळाची परीक्षा दिली आणि निवड झाली, ३२ ,३३ वर्षे नौकरीही झाली. असा हा एक टप्पा सुरू असताना शिक्षक पदोन्नतीने पूर्वीसारखे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्ताराधिकारी होतील असे त्यांना वाटत असताना हा निर्णय घेतला गेला, देशात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. शिक्षक एकवटला परंतु संसदेच्या सभागृहाच्या निर्णयाकडे लक्ष देऊन राहिला कुठेतरी आपल्याला न्याय मिळेल.

परीक्षेचे स्वरूप हे शिक्षकाच्या अभ्यासा पलीकचे दिसून येते. १५० गुणांची परीक्षा १५० मिनिटे वेळेत उत्तीर्ण होण्यासाठी एक आणि एकच अट ६०% गुण आवश्यक. या परीक्षेचा निकाल ९ टक्के लागतो. उत्तीर्ण होणारा वर्ग कमी दिसून येतो. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यास तर करावा लागणार. मानसिकता, सकारात्मकता दूरदृष्टी, विद्याभ्यॉंच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी गुरुजींचीही गुणवत्ता तपासणी असे अनेक कारणे देऊन परीक्षा गुरुजींच्या मानगुटीवर लादली आहे. परीक्षेला खंबीर विरोध न करता अनेक शिक्षक गोंधळलेल्या स्थितीत परीक्षा देत आहेत, कभी खुशी कभी गम ही स्थिती केवळ एकाची नाही. उत्तीर्ण झालेले शिक्षक जि.परिषदेच्या पायऱ्या झिजवत आहेत, आमचेच प्रमोशन कधी करणार? आमच्यासाठी जीआर तर निघाला आहे कार्यवाही सुरू करा. फोडा, झोडा आणि राज्य करा, एकाय पदावर काम करणाऱ्यांचे दोन गट दिसून येत आहेत- टीईटी उत्तीर्ण व टीईटी पासून दूर, अशा या शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात काम करत असताना अनेक आव्हाने पेलण्याची तयारी शिक्षकमंडळींनी ठेवली आहे, ते त्यांच्यासाठी नवीन नाही; मात्र कामाच्या बोजवऱ्याचे काय? बीएलओ चे काम, त्यामधील समस्या व निराकरण हा एक भाग, निपुण महाराष्ट्र online परीक्षा हा एक भाग, online zoom meeting, जनगणना, तातडीचे महत्वाचे या नावाखाली अनेक कामे लादली जात आहेत.

इंग्रजी शाळांच्या स्पर्धेत मराठी शाळा टिकवण्याची जबाबदारी... मराठी शाळा बंद पाडून इंग्रजी शाळांना मान्यता देण्याच्या मागील काही काळात घाट घातल्याचे दिसून आले. ग्रामीण भागात मराठी शाळा म्हणजे त्या गावाची शान आणि मान. विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक विकास म्हणजे शिक्षण. अमूर्ताकडून मूर्ताकडे, ज्ञाताकडून अज्ञाताकडे घेऊन जाण्याचे काम करणारे सर्व आमचे गुरुवर्य...

समाज रचनेला दिशादर्शक म्हणून काम करणारे शिक्षक, कोरोना काळात चेक पोस्ट, आरोग्य खाते, गॅस वाटप- राड नाही असे अनेक कामे निस्वार्थपणे पार पाडतात. या सर्वांतून मन सुन्न होते ते एकाच बाबीने टीईटी ची मग सक्ती कशासाठी? २०२७ पर्यंत उत्तीर्ण होण्याची मुदत करण्यासाठी अनेक शिक्षक आग्रही आहेत.



अनेकांच्या मनात एक मुद्दा उपस्थित होतो की नुसती टीईटी उत्तीर्ण झाले तर विद्यार्थ्यांची १००% गुणवत्ता वाढेल का? जर टीईटी घेण्यामागचा हेतू शुद्ध असेल तर मग २०२७ पर्यंत मुदत का?

गुरुजींच्या मानगुटीवर टीईटी सक्तीची! - २०२७ पर्यंत मुदतीची!

**लेखक – श्री पाखरे ज्ञानोबा विश्वंभर**
९४०३५०७२०६

# ही पोस्ट पूर्ण वाचाच, लंपट ज्योतिषाचा राजकीय झंटा-फंटा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**!

दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए हे नाशिकचा लिंगपिसाट ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने पुन्हा दाखवून दिलंय. अशाच्या बदकर्मी धंद्याचं मार्केटिंग महाराष्ट्र राज्य महिला आयोगच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी करावं, ह्यात धक्कादायक काही नाही. ही युतीदेखील नवी नाही.

थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी (जन्म : २४ ऑगस्ट १८८०; निधन : ३ डिसेंबर १९५१) ह्या निरक्षर होत्या. पण त्यांच्याकडे अद्भुत प्रतिभा, मर्मभेदी दृष्टी आणि विलक्षण समाजभान होतं. म्हणूनच त्यांनी ठणकावून सांगितलंय –

नको नको रे ज्योतिषा।
माझ्या दारी नको येऊ।
माझे दैव मला कळे।
माझा हात नको पाहू।।१

म्हणे नशिबाचे नऊ ग्रह।
तळहाताच्या रेघोट्या।
बापा नको मारू थापा।
अशा उगा खऱ्या खोट्या।।२

अशा खणखणीत शब्दांत बहिणाबाईंनी दारी आलेल्या ज्योतिष्याला हाकललंय. याउलट, ज्याला महिला लैंगिक शोषणाच्या प्रकरणात त्या कॅप्टन अशोक खरात ह्या ज्योतिष्याला नाशिक पोलिसांनी अटक केलं; त्याच्या दारी सुशिक्षित, मान्यवर मंडळी जायची. त्याच्या दर्शन- मार्गदर्शनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राधाकृष्ण विखे, दादा भुसे यांच्यासह आठ मंत्री नाशिकला अशोक खरातच्या मंदिर- आश्रमात जायचे. त्याच्या डोक्यावर छत्री धरलेले राज्य महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाकणकर आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीचे फोटो सोशल मीडियातून व्हायरल झाले आहेत. ह्या नराधमाला अटक करताना पोलिसांनी जे पेनड्राइव्ह जप्त केले; त्यात ५८ महिलांच्या लैंगिक शोषणाचा मुद्देमाल सापडलाय. तोही त्याचा ऑफिस बॉय संशयित नीरज जाधव ह्याने पैशाच्या लालसेपायी अशोक खरातला ब्लॅकमेलिंग (५ कोटी रुपये) केल्याने उघड्यावर आलाय.

त्र्यंबकेश्वर- नाशिक येथे दर १२ वर्षांनी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याला ३१ ऑक्टोबर २०२६ पासून प्रारंभ होत आहे. हा कुंभमेळा ४५ अमृत (शाही) स्नानांसह दीड वर्ष चालेल. त्यातील भोंदूगिरीचा हा भयानक ट्रीझर ज्योतिषी अशोक खरात आणि पारनेर (जिल्हा : अहिल्यानगर) येथील १८ वर्षांच्या मुलीला तिच्या आई- वडिलांचा, भावाचा खून करण्याची धमकी देऊन गेली ५ वर्षे लैंगिक अत्याचार करणाऱ्या वारकरी बुवा हभप अण्णा गुंजाळ ह्या कीर्तनकाराने दाखवला आहे. स्वतःला संत, महंत, साधू , बुवा- महाराज आणि ज्योतिषी म्हणून घेणारी ही मंडळी एकाच माळेचे मणी आहेत. ह्या साऱ्यांचीच छिनाल छाप वेद, उपनिषद आणि पुराण कथांवर असते. सापडत नाहीत, तोपर्यंत हे संधिसाधूच असतात. हे तांदळातल्या खड्यांसारखे आहे. हे खडे निवडेपर्यंत तांदळाच्या पोत्यात तांदूळ म्हणूनच असतात.

असाच ज्योतिषी अशोक खरात होता. तो स्वतःला अंकशास्त्रज्ञ (न्यूमरोलॉजिस्ट) आणि 'कॅप्टन' म्हणवून घ्यायचा. मर्चंट नेव्हीमधून अधिकारी म्हणून आपण निवृत्त झाल्याचे सांगायचा. ह्या खोट्या आळखीचा वापर करून त्याने स्वतःला बड्या राजकीय नेत्यांशी जोडून लोकांचा विश्वास संपादन केला होता. हा भोंदूगिरीचा झंटा आणि त्यात मी कृष्ण, तू राधा म्हणत होणारा महिलांच्या लैंगिक शोषणाचा फंटा नवा नाही. ( हे झंटा- फंटा शब्द बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी जोरदारपणे वापरले होते.)

आठ वर्षांपूर्वी अमरावतीतील पूर्णा नदीकाठच्या नृसिंह मठाचा प्रमुख बालयोगी ब्रह्मचारी महाराज (मूळनाव : मुरलीधर तायडे) सेक्स- सीडीमध्ये सापडला होता. त्याने बाथरूमचा भोगखाना बनवला होता. अशा लिंगपिसाट महाराजांपैकी कोल्हापूरचा तोडकर महाराज रंगेहाथ पब्लिकच्या तावडीत सापडला होता. (जानेवारी २००५) शिवलिंग महादेव तोडकर हा महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ (एमएसईबी)मध्ये कारकून होता. त्याची भविष्य कथनाची पद्धत अंकाशास्त्राशी संबंधित नसली तरी आकड्यांशी होती. त्याच्या येणाऱ्या गिऱ्हाईकाने जन्मकुंडली स्वतःच्या हातात ठेवायची. त्याला तोडकर महाराज एक संख्या मनात घडण्यास सांगे. ती धरल्याचे गिऱ्हाईकाने सांगितले की, तोडकर महाराज त्या संख्येतून १७ वजा करण्यास सांगायचा. त्यानंतर येणाऱ्या संख्येला ९ ने गुणायचे. जो गुणाकार यायचा; तो आकडा गिऱ्हाईकाने सांगताच, तोडकर महाराज म्हणायचा, तीच तुझी जन्मतारीख ! अशाच प्रकारे मुंबईतील कुर्ला येथील कर्वे गुरुजी आणि त्यांची मुलगी पिंकी, हे केवळ चेहरा पाहून भविष्य विचारायला येणाऱ्याची जन्मतारीख सांगत. अर्थात, ही पहिल्याच झटक्यात गिऱ्हाईक पक्कं करण्याची ट्रिक होती. ह्या जोरावर तोडकर महाराजने प्रचंड माया जमवली. वीज मंडळाच्या कारकुनाला ज्योतिष विचारायला वीजमंत्री यायचा.

कोल्हापुरात कोणी बडा राजकीय नेता, कलावंत, प्रशासकीय अधिकारी आला की, त्यांना महाराजांचे चमचे- नमते महाराजांच्या सिद्धी-चमत्काराच्या करामती ऐकवून त्यास गंजीमाळ परिसरातील द्रोणागिरी आश्रमात नेत. त्यापैकी काहींना तोडकर पदव्या- उपाध्या देऊन आपले करीत. अशाप्रकारे गळाला लागलेले भक्त तोडकर महाराजाला आपल्या संस्था- संघटनेच्या कार्यक्रमासाठी मुंबई- पुण्याला नेत. त्यावेळी महाराजांबरोबर विमानातून जाण्यासाठी बड्या- श्रीमंत भक्तांमध्ये चढाओढ लागायची. या साऱ्या बनावामुळे तोडकर महाराज कोल्हापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचे मानचिन्ह झाला होता. परंतु, वसई- भाईंदर येथून भविष्य समजून घेण्यासाठी कोल्हापुरात आलेल्या दोन तरुणींनी आश्रमातल्या खास खोलीतील तोडकर महाराजाचे अश्लील उद्योग जगजाहीर केले. त्याची पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. त्यातून कोल्हापुरात तोडकर महाराजाविरोधात लोकांदोलन उभे राहिलं. पोलीस त्याला जामिनासाठी कोर्टात नेत असताना, लोकांनी चपलेनं बडवलं. ब्रह्मचारी हनुमंताच्या आडोशाने लैंगिक खेळ खेळणाऱ्या तोडकर महाराजचं थोबाड हुप्प्या वानर दिसावा, इतकं सुजवलं. त्याच्या केसचा निकाल तो मरेपर्यंत (५ फेब्रुवारी २०१५) लागला नाही. त्याचा मात्र आश्रम अजूनही आहे.




१९९१ मध्ये नागपुरातील एका भक्ताच्या मुलीवर बलात्कार करणारा कृपाळू महाराज, त्या गुन्ह्याबद्दल ७ वर्षांची शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर आला आणि आस्था आणि संस्कार टीव्ही चॅनलवरून प्रवचनं देऊ लागला. अंगावर जिवंत साप घेऊन नागीन डान्ससाठी प्रसिद्ध असणाऱ्या स्वामी भीमानंद ह्याला प्रवचनाला येणाऱ्या मुलींना सेक्स रॅकेटमध्ये फसवल्याच्या आरोपाखाली (२०१० मध्ये) अटक झाली होती. बंगळूरचा स्वामी नित्यानंद यालाही तमिळ अभिनेत्री बरोबरचा सेक्स व्हिडिओ लीक केला म्हणून पोलिसांनी अटक केली होती. अशाचप्रकारे दोन मुलींवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली आसाराम बापू जेलबंद झाला. (२०१३) सोबत, त्याचा मुलगा नारायण साई हादेखील सुरतमधील दोन मुलींवर (दोघी बहिणी होत्या.) बलात्कार केल्याच्या आरोपाखाली जेलबंद झाला. तरीही आसाराम बापूच्या देशभरातील शेकडो आश्रमांपैकी एकाचीही वीट हलली नाही. ह्या नाकर्तेपणाची पैदास जे जे होईल, ते पहावे; चर्चा करावी आणि गप्प बसावे, या सामाजिक षंढपणातून झाली आहे.

३५ वर्षांपूर्वी धुळ्याचे भास्कर वाघ प्रकरण गाजलं होतं. तोही तोडकर महाराजांसारखा सरकारी कारकून होता. त्याने महाराज बनून सरकारी तिजोरीतील १४ कोटी रुपये लंपास केले होते. विशेष म्हणजे, तेव्हा भ्रष्टाचारविरोधी प्रशासकीय अधिकारी (खड)अशी ख्याती असलेले सदाशिवराव तिनईकर हे ह्या लफंग्या महाराजांचे भक्त होते. असा इतिहास असेल, तर नटण्या- दिसण्यासाठीच अधिक प्रसिद्ध असणाऱ्या रुपाली चाकणकर आणि ज्योतिषी अशोक खरात ह्यांच्या कनेक्शनचे काय घेऊन बसलात! तरीही, कथित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात यांच्या प्रकरणाला वाचा फुटल्यावर महाराष्ट्र राज्य महिला आयोगच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर ह्यांचे नाव विशेष चर्चेला आलं. त्यांच्या राजीनाम्याची मागणी होऊ लागली. कारण रुपाली चाकणकर यांनी गुरुमाऊली मानलेल्या खरात ह्याचे कारनामे महिलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आहेत.

सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये रुपाली चाकणकर नराधम खरातचा गौरव करताना म्हणतात, आईने मला जन्म दिला म्हणून, आई माझी गुरू! वडिलांनी मला शिक्षणाची योग्य संधी दिली, म्हणून ते माझे गुरू! पण मी कोण? माझा जन्म कशासाठी आहे? मी काय काम केलं पाहिजे? ह्याचं मार्गदर्शन अशोक खरात यांनी केल्याने, माझं सारं अस्तित्व हे गुरुमाऊली हेच आहेत ! आपल्या ह्या अंधभक्तीमुळे शेकडो मुली- महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त झालीत, ह्याचे भान चाकणकर बाईंना आता तरी आले आहे का? लोक अशांकडे श्रद्धेने जातात. तशाच प्रकारे रुपाली चाकणकर गेल्या असतील, अशी सारवासारव नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी केलीय. ती खोटी आहे. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

एथ वडील जें जें करिती।
तया नाम धर्मु ठेविती।
तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ।।
(ज्ञानेश्वरी, अध्याय ३, ओवी १५८ )

अर्थात, थोर लोक (नामवंत, मान्यवर) जे कर्म आचरतात; त्यालाच सामान्य लोक धर्म म्हणत त्याचे आचरण करतात. ह्यातून मान्यवर, सेलिब्रिटी, शासक, प्रशासक ह्याचं आचरण/ वर्तन कसे आणि कोणत्या प्रतीचे असावे, ते सांगितले आहे. ह्या अपेक्षेस पात्र नसल्याचे रुपाली चाकणकर यांनी डॉ. संपदा मुंडे आणि वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात यापूर्वीच दाखवून दिलेय. आता तर त्यांची अंधभक्ती ही बोगस कॅप्टन व लंपट ज्योतिषी असलेल्या अशोक खरात याच्या बदकर्मी उद्योगाची मार्केटिंग करणारी ठरलीय. अशोक खरातच्या शिष्या आणि त्याच्या श्री शिवालिक संस्थाच्या विश्वस्त असलेल्या रुपाली चाकणकर आता पीडित महिलांना कोणत्या तोंडाने काय न्याय देणार? आणि भटभिक्षुकांच्या पौरोहित्याप्रमाणेच ज्योतिषाला शैक्षणिक दर्जा देणारे सरकार कोणत्या तोंडाने अशोक खरातला शिक्षा करणार? चाकणकर बाईंनी राज्य महिला आयोग अध्यक्ष पदाचा राजीनामा दिलाय. हे ज्योतिषाच्या भाषेत गंडांतर असले तरी प्रत्यक्षात ते बदकर्माच्या साथीदारीचे फळ आहे.

ज्योतिष किंवा भविष्यकथन हे थोतांड असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. २० दिवसांपूर्वी इस्राएल- इराण युद्ध सुरू झालंय. त्याच वेळी दुबईत ज्योतिष्यांची परिषद होती. युद्धामुळे आखातातील विमान वाहतूक थांबल्याने ज्योतिषी दुबईत अडकून पडले. तिथल्या युद्धजन्य परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी प्रत्येक ज्योतिषी आपल्या देशाच्या- राज्याच्या शासक – प्रशासकांकडे मदतीसाठी फोन करू लागला. यातून, ज्यांना आपल्या भविष्यात काय वाढून ठेवले ते समजत नाही; ते इतरांचे भविष्य काय सांगणार, असा प्रश्न निर्माण झाला. अशीच हालत आता चाकणकरबाईंच्या गुरुमाऊलीची झालीय. तरीही त्या ज्योतिष – भविष्य कथन हे थोतांड आहे, अशी कबुली देण्याची शक्यता नाही. कारण, पाच वर्षांपूर्वी (जानेवारी २०२१) ज्योतिष शास्त्राला शैक्षणिक प्रतिष्ठा देण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतलाय. त्यानुसार, 'केंद्र सरकार'च्या अखत्यारितील 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ'ने (IGNOU- इग्नू) ज्योतिषशास्त्राची 'मास्टर्स डिग्री' (MA) देणारा दोन वर्षांचा अभ्यासक्रम सुरू केलाय. त्यात ज्योतिषशास्त्राच्या विविध शाखांबाबतचं व्यावहारिक शिक्षण विद्यार्थ्यांना दिलं जातं. ह्या निर्णयास, ज्योतिषशास्त्र हे अवैज्ञानिक असल्याने हा अभ्यासक्रम रद्द करावा, अशी मागणी विज्ञान प्रचार-प्रसाराचं काम करणार्या संस्था- संघटनांनी केली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने तेव्हा प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून म्हटले होते की, ''ज्योतिष या विषयाला कोणताही शास्त्रीय आधार नाही. ते 'छद्म विज्ञान' आहे. ग्रह-तार्यांचा शास्त्रीय अभ्यास करणार्या विज्ञान शाखेला 'खगोलशास्त्र' म्हणतात. त्या शास्त्राच्या उपलब्ध अभ्यासानुसार, आकाशातल्या ग्रह-तार्यांचा मानवी जीवनावर कोणताही प्रभाव पडत नाही; परिणाम होत नाही. त्यामुळे अशा संपूर्ण अशास्त्रीय गोष्टींचे प्रशिक्षण देण्याचा दावा करणारा 'ज्योतिष' अभ्यासक्रम रद्द करावा!'' ही त्यांची मागणी योग्य आणि विज्ञान प्रसाराचा आग्रह धरणाऱ्या 'भारतीय संविधान'ला धरून होती. पण त्याची सरकारी पातळीवर दखल घेतली नाही.

अशाच प्रकारचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय २००१ मध्ये 'भाजप आघाडी' (छऊ)च्या 'वाजपेयी सरकार'नेही घेतला होता. त्याला मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने तो रद्द करण्यात आला. हा विरोध करणाऱ्यांमध्ये ज्येष्ठ खगोल वैज्ञानिक डॉ.जयंत नारळीकर यांचाही समावेश होता. भारतीय वंशाचे 'नोबेल' पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ व्ही.के. वेंकटरामन यांनी ज्योतिषशास्त्राची तुलना 'छद्म' विज्ञानाशी (स्यूडोसायन्स) केलीय. 'छद्म' विज्ञान म्हणजे, विज्ञानासारखी मांडणी करून केलेली फसवणूक! ह्यात ज्योतिषशास्त्र 'क्रमांक एक' वर आहे; आणि ते विविध प्रकारे जगभर आहे. ह्या सार्यांचा उद्योग आकाशातल्या ग्रह-तार्यांवर असतो. त्यातही भारतीय ज्योतिष्यांनी आपली उंची वाढवण्यासाठी त्याला भटी शेंडी लावल्याने आकाशात नसलेले 'राहू-केतू' हे काल्पनिक ग्रह जन्मकुंडलीत आणले आहेत. ते 'कालसर्पयोग' बनून (ज्याची जन्मकुंडली तयार केली आहे त्या-) जातकाला 'नारायण-नागबळी' विधीसाठीचं 'गिर्हाईक' बनवतात.

याशिवाय, शनीची साडेसाती, २२ कोटी किलोमीटर दूरवर असलेल्या मंगळाची 'कडक' बाधा, हातावरच्या गुरू-बुध-शुक्राचा दुबळेपणा दाखवणाऱ्या रेषा- चिन्हं- उंचवटे जाळ्या आहेत. शुभ-अशुभ दिवसाचे, मुहूर्ताचे खूळ आहे. वास्तुशास्त्र, 'नाडी'माहात्म्य, जपजाप्य- मंत्रमाहात्म्य यांचे उपाय-तोडगेही आहेत. ह्या साऱ्या बनावट उद्योगांसाठी 'मास्टर ऑफ आर्ट' ज्योतिषी बनवून 'मोदी सरकार' लोकांनी कष्टाने कमावलेल्या पैशांवर हात मारणारे खिसेकापू आणि दरोडेखोर तयार केलेत; तसेच स्त्रियांची अब्रू लुटणारेही तयार केलेत ; त्यांना प्रतिष्ठा दिलीय; हे अशोक खरातच्या प्रकरणावरून स्पष्ट होते.

छत्रपती शिवरायांच्या आणि राजमाता जिजाऊंच्या चरित्राची नटव्या-नाटकी शब्दांत विटंबना करणाऱ्या कथित 'शिवशाहीर' ब. मो. पुरंदरेंना 'महाराष्ट्रभूषण पुरस्कार' देऊन 'फडणवीस सरकार'ने त्याच्या नालायकीला 'सरकारमान्य' केले. तोच प्रकार 'मोदी सरकार'ने राष्ट्रीय विद्यापीठातून ज्योतिषशास्त्राचा 'मास्टर डिग्री'चा अभ्यास राबवून नकली विज्ञानाला 'सरकार मान्यता' देऊन केला आहे. २,००० कोटी रुपये खर्चून तयार केलेलं भारताचे चांद्रयान चंद्रावर पोहोचले नाही. ते पोहोचणार नाही, असे भाकीत देशातील एकही ज्योतिषी करू शकला नाही. तिथे 'मोदी सरकार'ने तयार केलेले 'मास्टर्स' ज्योतिषी लोकांच्या कुंडल्या मांडून, हस्तरेषा पाहून त्यांच्यावर आकाशातल्या ग्रह-तार्यांचा प्रभाव किती पडतो, ह्याचा काय डोंबलाचा अभ्यास करणार आणि त्यांचे भविष्य सांगणार?

आई-वडील, पूर्वजांचे गुण-दोष अपत्यात उतरतात. तसे, चंद्रसूर्यादि ग्रहांवरून येणार्या लहरींचे ठसे गर्भातून बाहेर येताना अर्भकाच्या मृदू शरीरावर उमटतात आणि त्याच्यात काही शारीरिक व बौद्धिक दोष जन्मत:च निर्माण करतात! ह्या गृहीतकावर ज्योतिषशास्त्राचा डोलारा उभा आहे. परंतु, चंद्रसूर्यादी ग्रह-तार्यांच्या प्रकाश-लहरींचा कोणताही परिणाम अर्भकावर होत नाही, हे विज्ञानाने सिद्ध केलंय. कारण सूर्याचा प्रकाश आपणापर्यंत आठ मिनिटांनंतर पोहोचतो. इतर ग्रह-तार्यांच्या प्रकाश-लहरी आपणापर्यंत पोहोचण्यास शेकडो वर्षे लागतात. अशा परिस्थितीत ग्रह-तार्यांचे प्रभाव-परिणाम मानवी जीवनावर कसे होणार? ते होत नाहीत, हे इयत्ता आठवीच्या पुस्तकात शिकवायचे आणि 'एमए'ला त्याच्या उलटे शिकवायचे, हा 'मोदी सरकार' पुरस्कृत उफराटेपणा आहे. त्यासाठी ज्योतिषशास्त्राचा 'देशी बाणा' दाखवला जातो; तोही खोटा आहे. कारण १२ राशी आणि जन्मकुंडलीतल्या १२ घरांत लोकांना 'गिर्हाईक' बनवणारं ज्योतिषशास्त्र हे 'भारतीय' नाही. १२ राशी ही 'ग्रीक कालगणना' पद्धत आहे. 'भारतीय कालगणना' ही २७ नक्षत्रांवर आधारित आहे.

राशीला आलेल्या ग्रहांचा इष्ट-अनिष्ट परिणाम अनिवार्य किंवा अटळ असतो; असे ज्योतिषीही मान्य करीत नाही. तसा इतिहास नाही. तरीही भय, अज्ञान, अगतिकता यामुळे लोक ज्योतिष्यांचे 'गिर्हाईक' बनतात. अरिष्ट टाळण्यासाठी, ग्रहशांती करण्यासाठी तोडगे-विधी करतात. थोरले माधवराव पेशवे यांना क्षयरोगाने मृत्यूच्या दाढेत लोटले. त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी 'मृत्युंजय' मंत्राचा गजर अखंड चालू ठेवण्यासाठी शेकडो ब्राह्मण नियुक्त केले होते. तरीही, त्यांच्या मंत्रजागराला न जुमानता मृत्यूने माधवरावांना ओढून नेले!

दुसरे महायुद्ध गाजवणारा जर्मनीचा 'हुकूमशहा' हिटलर ह्याचा ज्योतिषावर नितांत विश्वास होता. त्याने आपल्या दिमतीला पाच प्रख्यात 'ज्योतिर्भास्कर' बाळगले होते. त्यापैकी एकाला (त्याला स्वत:चेच भविष्य न समजल्यामुळे) इंग्लंडच्या हेरांनी पळवून नेले. उरलेले चौघे हिटलरला सल्ला देण्यास तत्पर होते. पण त्यांच्या सल्ल्याचा काडीमात्र उपयोग झाला नसल्याचे इतिहास सांगतो. आपला संपूर्ण पराभव होऊन शत्रूच्या हातात सापडण्याची नामुष्की टळावी, यासाठी हिटलरने स्वहस्ते स्वतःला भडाग्नी दिला. हा निर्घृण प्रकार टाळण्यासाठी ग्रहांची अनुकूल स्थिती मिळवण्यात ज्योतिष्यांना यश लाभले नाही. चौघांपैकी एका ज्योतिष्याला तर हिटलरच्याच 'कॉन्सन्ट्रेशन कॅम्प'मध्ये मृत्यू आला. हिटलरचा विश्वासू मित्र हिमलर याचाही ज्योतिषशास्त्रावर गाढ विश्वास होता. त्याने हिटलर जगतज्जेता व्हावा, यासाठी २४ 'मंत्र-तंत्रज्ञ' ज्योतिष्यांवर चमत्कारिक सहाय्याचे काम सोपवले होते. त्यातील एका ज्योतिष्याने इटलीच्या नकाशावर 'सिद्धिलंबक' ठेवला असता; त्या लंबकाच्या डोलण्याने हिटलरच्या यशाची खात्री दिली होती. पण भविष्य उलटे फिरले! हिटलर दुसरे महायुद्ध हरला.

राजर्षी शाहू महाराजांकडे भविष्यकथन करण्यासाठी एक नामवंत ज्योतिषी आला. शाहूराजांनी त्याला दोन दिवसांच्या कडक उपासाचा आणि चाबकाच्या फटक्यांचा पाहुणचार दिला. तो टाळण्यासाठी ज्योतिषी गयावया करू लागला. शाहूराजांनी त्याला सुनावलं, ''दोन दिवसांनी तुझ्यावर कोणतं संकट कोसळणार आहे, ते तुला ज्योतिषशास्त्राने समजत नाही. तू काय माझं भविष्य सांगणार? लोकांना फसवण्याचे हे धंदे बंद कर!'' ज्योतिषशास्त्राचा खोटेपणा शाहूराजांनी कृतीतून सप्रयोग उघडा पाडला. '१९६४ मध्ये तिसरे महायुद्ध होणार', '२००० मध्ये जगबुडी होणार', त्याआधी 'हिमालय वितळणार', अशी भविष्यकथनं नामवंत ज्योतिष्यांनी केली होती. ती खोटी ठरली. तसेच, 'गांधीजींची हत्या होणार', 'कॉम्प्युटरवरून कुंडल्या निघणार', 'टीव्हीवरून ज्योतिष सांगितले जाणार', 'जगाला लॉकडाऊन करणारी कोरोना- महामारी येणार,' याबाबत सावधानतेचा इशारा देणारं भविष्य जगातल्या एकाही ज्योतिष्याने कथन केलेलं नव्हतं. ह्या शास्त्रात उडाला तर पक्षी आणि बुडाला तर बेडूक ठरवणारी चलाखी आहे!

लग्नासाठी जन्मपत्रिकचे ३६ गुण जुळवण्याच्या बहकाव्यातून वर्ण्य-जाती व्यवस्थेची तुच्छता ज्योतिषशास्त्रातून पोसली जाते. उच्च जातीतल्या मुलीशी लग्न करणाऱ्या मुलाचा आणि कनिष्ट जातीतील मुलाशी लग्न करणाऱ्या मुलीचा गुण-जुळणीत एक-एक गुण कमी होतो. अशा जातिभेद घट्ट करणाऱ्या शास्त्राचं भविष्य हे त्याच्या इतिहासासारखेच खोटेच ठरणारे असणार! हे असंख्य पुराव्यांनिशी स्पष्ट झाले आहे.

आकाशातल्या आणि कुंडलीतल्या ग्रहांपेक्षा मनाचा निग्रह श्रेष्ठ असतो, अशी खात्री लोकांना देण्याची आज आत्यंतिक गरज असताना 'मोदी सरकार' मात्र राष्ट्रीय विद्यापीठातून 'मास्टर्स ज्योतिषी' तयार करीत आहे. त्याचं मार्केटिंग रुपाली चाकणकर यांच्यासारखे सत्ताधारी करीत आहेत, ही देशाच्या 'बौद्धिक महामारी'ची तयारी आहे. तिच्या समूळ उच्चाटनासाठी 'फुले-शाहू-आंबेडकर' यांचा विचार कृतीत आणणे, हीच जालीम लस आहे. ती घ्या आणि 'लॉस'मुक्त आयुष्य जगा ! बहिणाबाई चौधरी यांची ज्योतिषावरची कविता वाया घालवू नका!

**– ज्ञानेश महाराव, जेष्ठ पत्रकार,**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री शेत्र खंडोबा मंदिर बाळे तीर्थक्षेत्रास 'क' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मंजूर

## महापालिकेकडे प्रस्ताव सादर केला होता; मंदिराचा विकास अधिक वेगाने होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बाळे येथील प्रसिद्ध श्री क्षे त्र खंडोबा मंदिर या तीर्थक्षेत्राला 'क वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक पाच प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक मा समाधान भाऊ आवळे यांनी यासंदर्भातील प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मांडला असून हा प्रस्ताव सर्वांमध्ये मंजूर करण्यात आला महत्त्वाची बाब म्हणजे सदर प्रस्ताव देवस्थान पंच कमिटी व ट्रस्टीमंडळ यांनी सुमारे सहा महिन्यापूर्वी महापालिकेकडे दाखल केला होता. त्यानंतर पाठपुरावा करून हा विषय सगळे पुढे आणण्यात आला आणि




अखेर त्यास मंजुरी मिळाली तसेच आयुक्तांच्या दिनांक १०/३/ २०२६ रोजी च्या मान्यता नुसार या प्रकरणी धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील काही बाबी प्रलंबित असल्याचा त्या पूर्ण करणे तसेच सर्व कायदेशीर बाबींची तपासणी करून निधी व न्याय विभागाकडून अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करण्याची निवेदन देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे बाळे येथील श्री क्षेत्र खंडोबा मंदिराला विकास अधिक वेगाने होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे क वर्ग पर्यटन स्थळाला दर्जा मि ळाल्यानंतर येथे रस्ते पाणीपुरवठा स्वच्छता प्रकाशयोजना तसेच पर्यटकांसाठी आवश्यक सोयी सुविधा उभारण्यासाठी शासनाकडून निधी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. श्री शेत्र खंडोबा मंदिर हे परिसरातील भाव श्रद्धास्थान असून वर्षभर येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे या पर्यटकांचा विकास होणे याचे अनेक वर्षापासून गरज होती

नगरसेवक माननीय समाधान भाऊ उबाळे यांच्या पुढाकारामुळे हा प्रस्तावाला गती मिळाली असून स्थानिक नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे भविष्यात बाळे हे एक महत्त्वाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नगरसेवक आवळे तसेच देवस्थानचे पंच कमिटी ट्रस्टी मंडळ यांची विविध स्तरातून आवेदन करण्यात येत आहे.

# पुणे शिक्षक मतदार संघात डॉ. बी.पी .रोंगे यांचा प्रचार दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/ प्रतिनिधी : जुलै महिन्यात पुणे पदवीधर व पुणे शिक्षक मतदार संघाचे विधानसभेची मुदत संपत आहे. त्यामुळे निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. यांना शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी डॉ. बी.पी. रोंगे सर इच्छुक असून त्यांनी पहिल्या टप्प्यात प्रचारास मोठ्या प्रमाणात सुरुवात केली आहे. डॉ. बीपी रोंगे यांनी सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे येथे वेगवेगळ्या दौरा करून ५० हजार नवीन शिक्षकांची नोंदणी केली आहे.

त्यांनी शिक्षकांच्या अडीअडचणी वेळो वेळी जाणून घेतले आहेत त्यांनी निवडणुकीची तयारी केल्या असून पहिल्या टप्प्यात पुणे शिक्षक मतदार संघातून भाजपकडून त्यांना उमेदवारी मिळण्याचे संकेत मिळत आहेत. शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी त्यांनी या अगोदर शिक्षक मतदारसंघाचे नेतृत्व केले आहे. यंदा त्यांनी पुन्हा निवडणूक रिंगणात उभे राहण्याची तयारी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे. पुणे शिक्षक मतदार संघात डॉक्टर बीपी रोंगे, विरुद्ध दत्तात्रय सावंत यांच्यामध्ये लढत होण्याची अशी चर्चा रंगू लागली आहे.

# अ‍ॅट्रोसिटी कायद्यातील बदलांविरोधात विधानसभेचे उपाध्यक्ष मा. अण्णा बनसोडे यांना निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपरी-चिंचवड :नुकत्याच झालेल्या विधानपरिषद अधिवेशनात सामाजिक न्याय मंत्र्यांनी अ‍ॅट्रोसिटी कायद्यांतर्गत (डउ/डढ लीं) तातडीची अटक थांबवून आधी चौकशी करण्याचा जो निर्णय जाहीर केला आहे, त्याविरोधात दलित-बहुजन समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या निर्णयाचा निषेध करण्यासाठी आणि तो तातडीने रद्द करण्याच्या मागणीसाठी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व व सर्व पक्ष संघटना आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरामध्ये तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता, या प्रश्नाबाबत आज दिनांक ..... रोजी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष मा. श्री. अण्णा बनसोडे साहेब यांना भेटून सविस्तर निवेदन देण्यात आले.

हुजन कष्टकरी जनता आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी अ‍ॅट्रोसिटी कायद्याचे कवच शिथिल करण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, याबाबत समाजाचे प्रतिनिधी म्हणून आपण सभागृहामध्ये याबाबत चर्चा करून आणावी, आणि महाराष्ट्रातील सर्व गलित बहुजन समाजाला निघून जावा अशी मागणी करण्यात आली,

निवेदनातील प्रमुख आक्षेप:

१. सुरक्षा कवचाचे खच्चीकरण: 'आधी चौकशी मग अटक' या धोरणामुळे गुन्हेगारांचे धाडस वाढेल, साक्षीदारांवर दबाव येईल आणि पुरावे नष्ट होण्याची भीती आहे.

२. सामाजिक सलोखा धोक्यात: कायद्यातील जरब कमी केल्यास समाजात जातीयवादी शक्तींचे मनोबल वाढून गावागावांत सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे.

**अण्णा बनसोडे यांच्या भेटीनंतर सोम वार दिनांक २३ रोजी होणारे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची घोषणा डॉ. बाबा कांबळे यांची सर्व पक्षी संघटनेच्या वतीने केली आहे,**

३. संविधानाचा अपमान: संविधानाने दिलेल्या विशेष संरक्षणात्मक तरतुदींना शिथिल करणे हा समाजाच्या अस्तित्वावर मोठा आघात आहे.

डॉ. बाबा कांबळे यांचा इशारा:

यावेळी बोलताना डॉ. बाबा कांबळे म्हणाले की, राज्यात दलितांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असताना कायद्याचे संरक्षण काढून घेणे अनाकलनीय आहे. सरकारने हा दलितविरोधी निर्णय तातडीने मागे न घेतल्यास संपूर्ण महाराष्ट्रात रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडले जाईल.

उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची भूमिका:

विधानसभेचे उपाध्यक्ष मा. अण्णा बनसोडे यांनी शिष्टमंडळाची बाजू अतिशय गांभीर्याने ऐकून घेतली. ते म्हणाले की, दलित आणि बहुजन समाजावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ दिला जाणार नाही. या विषयाची दखल घेतली असून, तुमचे हे निवेदन मी स्वतः तातडीने योग्य त्या कायदेशीर कारवाईसाठी आणि पुढील पाठपुराव्यासाठी सरकारकडे पाठवत आहे. या सकारात्मक आश्वासनानंतर तूर्तास आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याचे डॉ. बाबा कांबळे यांनी जाहीर केले.

**उपस्थित मान्यवर:**

याप्रसंगी अंजना गायकवाड (ज्येष्ठ कार्यकर्त्या), शिवशंकर रुबाळे (अध्यक्ष, भीमशाही युवा संघटना), गोपाल मोरे (युवा सेना नेते), शुभम तांदळे (अध्यक्ष, महाराष्ट्र रिक्षा पंचायत विभाग), प्रसाद बोराडे आणि इतर प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहा येथील तक्षशिला कसबे हिची नवोदयसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



प्रविण कसबे/ मोहा प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मोहा येथील तक्षशिला कसबे हिने धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेतील विद्यार्थीनी तक्षशिला बन्सी कसबे हिने अथक परिश्रमाने ९६ .२५ टक्के गुण मिळवत नवोदय प्रवेश परिक्षेत उत्तीर्ण झाली असल्याने तुळजापूर येथील जवाहर नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरली आहे.


तडवळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेतून तक्षशिलाने दुसरा क्रमांक पटकावला आहे.तक्षशिलाची जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.तिच्या या यशाचे कौतुक, सत्कार होत आहे.

# पडघ्यात 'ओम शांती कॉम्प्युटर्स'कडून विद्यार्थ्यांना प्रवेशाचे आवाहन

**डिजिटल युगात करिअर घडवण्यासाठी एमएस-सीआयटी, प्रोग्रामिंग, नेटवर्किंगसह विविध कोर्सेस; १००% प्रॅक्टिकल प्रशिक्षणाची सुविधा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील ओम शांती कॉम्प्युटर्स क्लासेसतर्फे विविध संगणक कोर्सेससाठी विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डिजिटल युगात रोजगाराच्या वाढत्या संधी लक्षात घेता संगणक शिक्षणाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले असून, विद्यार्थ्यांनी तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात कॉम्प्युटर क्लासेसमुळे विद्यार्थ्यांना एम.एस. ऑफिस, प्रोग्रामिंग, नेटवर्किंग यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचे ज्ञान मिळते. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो तसेच त्यांना विविध क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध होतात. डिजिटल



साक्षरतेमुळे व्यक्ती इंटरनेटचा प्रभावी वापर करून स्वतःची कामे स्वतः करू शकते, ज्यामुळे व्यावसायिक प्रगतीसाठीही मोठी मदत होते.

२५ वर्षांची समृद्ध शैक्षणिक परंपरा जपणारे ओम शांती कॉम्प्युटर्स क्लासेस हे पडघा ग्रामीण भागातील विश्वासार्ह व शासनमान्य संगणक प्रशिक्षण केंद्र म्हणून ओळखले जाते. येथे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासह दर्जेदार शिक्षण, अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन आणि १०० टक्के प्रॅक्टिकल प्रशिक्षण दिले जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि एमएस-सीआयटीच्या युगात अद्ययावत कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत क्लासेसचे संचालक संजय पटेल यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी विविध कॉम्प्युटर कोर्सेसमध्ये प्रवेश घेऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी संजय पटेल (मो. ८०८७३५५५५६) किंवा पूजा पवार (मो. ८९५६५८८६८१) यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांच्या महसूल विषयक अडचणी सोडवण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी डि.व्ही.सिरसेवाड पाटील यांनी उचलले सकारात्मक पाऊल**

# सारोळा मांडवा येथे बळीराजाची हाक, महसूल मित्राची साथग्रुपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिपक क्षिरसागर/वाशी :

वाशी तालुक्यातील सारोळा मांडवा येथे शेतकऱ्यांच्या महसूल विषयक अडचणी सोडवण्यासाठी आणि शासकीय योजनांची माहिती थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी, शेतकरी बांधवांना सकारात्मक संदेश देण्यासाठी मौजे.सारोळा मांडवा येथील ग्राम महसूल अधिकारी डि.व्ही.सिरसेवाड पाटील यांनी शेतकरी बांधवांसाठी एक सकारात्मक पाऊल उचलले, व गावात एक ग्रुप तयार केला. बळीराजाची हाक,महसूल मित्राची साथ गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सर्वप्रथम त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. तसेच गावातील गावकऱ्यांच्या मदतीने गावात पाणपोईचा शुभारंभ केला. ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्यांना सांगितले की, आपण नेहमी निसर्गाशी झुंज देत असतो कधी अवेळी पडलेला पाऊस, गारपीट, दुष्काळ तर कधी बाजार भाव, बी बियाणे अशा अनेक अडचणी शेतकरी बांधवांना उद्भवत असतात. या सर्व अडचणीवर मात करण्यासाठी सर्व शेतकरी बांधवांनी ग्रुपच्या माध्यमातून एकत्रित येऊन गट शेती करावी. आपल्याला एखादी अडचण आल्यास खचून न जाता आपल्या अडचणी ग्रुपच्या



माध्यमातून मांडावी जेणेकरून आपल्याला मदत उपलब्ध करून देणे सोयीचे होईल. उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. कुठल्याही एकाच पिकाची कास न धरता जास्तीत जास्त अंतर पीक घेऊन आधुनिक शेती करावी. असे सांगितले. तसेच दिनांक१० एप्रिल २०२६ रोजी मौजे पारा येथील रिदेश लॉन्स (मंगल कार्यालयामध्ये) छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर आयोजित केले आहे. तरी त्याचाही सर्वांनी लाभ घ्यावा, तसेच आगामी उन्हाळ्यात पाण्याचा काटकसरीने वापर करावा, उन्हापासून आपल्या पशुंचे संगोपन करावे, आतापासूनच शेतीची चांगली मशागत करून खरीप हंगामाचे योग्य नियोजन करावे असे ग्राम महसूल अधिकारी डि.व्ही. शिरसेवाड पाटील यांनी सांगितले. असा उपक्रम साजरा केल्याबद्दल शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते.

# खामसवाडी येथे तुकाराम बंडगर यांच्या स्मरणार्थ पाणपोई चे उद्घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे : खामसवाडी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे कै. तुकाराम बंडगर यांच्या स्मरणार्थ श्री ज्ञानेश्वर बंडगर यांच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज चौकात दररोज दहा थंडगार जारच्या मोफत पाणपोईची सुरुवात करण्यात आली. ही पाणपोई दोन महिने चालू राहील त्याचे उद्घाटन गावातील सोसायटी चेअरमन श्री.संजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सध्या उन्हाळा वाढला असून, पिण्याच्या पाण्यासाठी गावातील लोकांना व विद्यार्थ्यांना थंडगार पाण्याची व्यवस्था व्हावी, यासाठी गावातील युवक ज्ञानेश्वर बंडगर यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ दररोज दहा थंडगार जारचे पाणी चौकात उपलब्ध केले आहे. या उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य विश्वास कोकणे, ग्रामपंचायत सदस्य किरण पाटील, सादिक सय्यद, बाबा बंडगर, शेषराव बप्पा शेळके, सतीश माने, राजेभाऊ सुर्यकांत शेळके, शंकर तांदळे, कुलदीप घावटे, नुसार मुंडे, बाबासाहेब माने, शहाजी आबा शेळके, श्याम पाटील, वाल्मीक कोळी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- कै. तुकाराम बंडगार यांच्या स्मरणार्थ २ वर्षापासुन पाणपोईची सुरुवात
- श्री ज्ञानेश्वर बंडगार यांच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज चौकात दररोज १० थंडगार जारच्या मोफत पाणपोई
- गावातील लोकांना व विद्यार्थ्यांना थंडगार पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी उपक्रम
- विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन श्री.संजय पाटील यांच्या हस्ते उद्घाटन...

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा

## नुकसान भरपाईची खासदार प्रणिती शिंदे यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील मार्च २०२० दरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून याची तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी केले आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की गेल्या दोन दिवसापासून मंगळवेढा, अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर, उत्तर सोलापूर आणि दक्षिण सोलापूर, तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस व गारपीट झाले आहे. तसेच पुढील दोन दिवसासाठी हवामान विभागानेही अशाच परिस्थितीचा इशारा दिला आहे या उपळी पावसामुळे काढण्यात आलेली गहू हरभरा ज्वारी कांदा यासारख्या पिकाची मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्याचबरोबर द्राक्ष काढणे सुरू असताना शेतकऱ्यांना फटका



बसला असून डाळिंब केळी कांदा व दोडका या पिकांनाही गारपिटीचा मोठ्या फटका बसल्याचे त्यांनी नमूद केले आहे या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केले आहे.

# नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेचा आदर्श सरपंच पुरस्कार विक्रम कांबळे यांना जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनीधी/अमर जाधव सारणीकर : औसा तालुक्यातील येळी देवंग्रा ग्रामपंचायतचे सरपंच विक्रम कांबळे यांना महाराष्ट्रातील अग्रगण्य असलेले नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेचा मानाचा आदर्श सरपंच पुरस्कार विक्रम कांबळे यांना जाहीर झाला आसुन, येळी देवंग्रा गावचे सरपंच विक्रम कांबळे यांनी आपल्या येळी देवंग्रा गावातील लोकांसाठी ग्रामपंचायत माध्यमातुन अनेक विकासकामे केल्याने येळी देवंग्रा गावातील शेतकर्यांना सिंचन विहीर व गोटे देने ,गावातील १००-१२० निराधारांना पगारी करणे, येळी गावातील जिल्हापरीषद शाळा डिजीटल करल एल ई डी देणे, येळी देवंग्रा गावातील अंतर्गत रस्ते सिमेंट व पेव्हर ब्लॉकचे करत, खडी केंद्र ते येळी मुख्य रस्ता जलजिवन मिशनचे काम ९०% पुर्ण करणे,येळी गावातील मुख्य चौकात ग्रामपंचायत व येळी ग्रामस्थांच्या सहकार्यातुन छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणी केला सह गावातील अनेक विकासात्मक कामे केल्याने या विकास कामाची दखल घेउन आदर्श सरपंच हा पुरस्कार जाहीर केला आहे



यावेळी उपसरपंच अजीत धुमाळ, माणिक लोंढे, भास्कर बंडगर, वामन बंडगर, जयश्री कीरवले, छायाताई लोंढे, जमाबाई धुमाळ ,शितलताई धुमाळ, दिपक पाटील, श्री संत शिरोमनी मारुती महाराज साखर कारखाना संचालक संतोष भोसले, केशवराव डांगे, मा.सरपंच बाबुराव धुमाळ, बळीराम पाटील, प्रसाद पाटील, विकास साठे, बाळु साठे, राजकुमार मांजरेकर, हनमंत कांबळे, आशोक माने, ईश्वर माने, प्रविन भोसले, विष्णु कीरवले, कालीदास डांगे, ज्ञानेश्वर कीरवले, रंगराव पाटील, बाळासाहेब पाटील, श्रीमंत मोरे, बलभिम गीरी, विलास कोतापुरे, शंकर चौधरी, दयानंद साठे, मारुती कांबळे, अजबोद्दीन शेख, लखन कीरवले, लखन कीरवले, प्रकाश कीरवले, रमेश जाधव, सह येळी देवंग्रा ग्रामस्थांनी शुभेच्छा दिल्या.

# रानवडमध्ये पवार कुटुंबावर काळाचा घाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : रानवडमध्ये पवार कुटुंबावर मोठा आघात करणारी दुर्घटना रविवारी उघडकीस आली. घरातील किरकोळ वादानंतर मुलांना केस कटिंगसाठी घेऊन जातो असे सांगून बाहेर पडलेल्या दीपक पोपट पवार (वय २८) यांनी आपल्या तीन मुलांसह घर सोडले. काही तासांनी निफाड हद्दीतील पालखेड डाव्या कालव्यात दोन चिमुकल्यांचे मृतदेह सापडले आणि संपूर्ण परिसरात खळबळ उडाली.

सापडलेल्या मुलांची आेळख निफाड पोलिसांनी सोशल मीडियाच्या मदतीने व चौकशीतून पटवून दिली. मृत मुलांची नावे प्रसाद दीपक पवार (वय तीन वर्ष) आणि वीर दीपक पवार (वय पाच वर्षे) अशी आहेत. हे दोघे रानवड

**वडीलांसह दोन मुलांचे मृतदेह कालव्यात; व मुलगा अविनाश बेपत्ता**

येथील असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर दीपक पवार आणि त्यांचा तिसरा मुलगा अविनाश यांचा शोध सुरू करण्यात आला.

दीपक, त्यांची पत्नी पूजा आणि भाऊ राहुल हे तिघेही सात वर्षांपासून शिवप्रसाद वाघा व्हाईन्स येथे काम करत होते. त्यामुळे ही दुर्घटना अधिकच काळजाला चटका लावणारी ठरली आहे. कालव्यात तसेच परिसरात शोधमोहीम सुरू असून वडीलांचा शोध लागला असुन आणि एख मुलाचा शोध अद्यापही लागलेला नाही.

या संपूर्ण घटनेचा तपास पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड पोलिसांकडून सुरू आहे. गावात आणि तालुक्यात दुःखाची तसेच चिंतेची छाया पसरली आहे. या घटनेचा पुढील तपास कपालेश्वर ढेकले पोलीस सागर जाधव योगेश खर्जे हे करत आहे

# निफाड थरारलं! अनैतिक संबंधातून खून - पोलिसांनी फोडला भयंकर कट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्ह्यातील निफाड शहरात मानवी नात्यांचा काळाकुट्ट चेहरा समोर आणणारी अंगावर काटा आणणारी घटना उघड झाली आहे. अनैतिक संबंधांच्या विळख्यात अडकलेल्या अरुण ढेपले याने रंभाबाई काळे यांचा निर्दयीपणे गळा आवळून खून करत मृतदेहाची अमानुष विल्हेवाट लावल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.



मामलेदार चौकातील रंभाबाई काळे या २४ फेब्रुवारीपासून बेपत्ता झाल्यानंतर नातेवाईकांनी निफाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सुरुवातीला साधं बेपत्ता प्रकरण वाटणाऱ्या या घटनेमागे भीषण खून दडलेला असल्याचा संशय निफाड पोलिसांच्या चाणाक्ष नजरेने ओळखला आणि इथूनच सुरू झाला एका थरारक तपासाचा खेळ!

ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, विभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ, पीएसआय विजय गायकवाड यांनी अक्षरशः तपासाची चक्रे झपाट्याने फिरवत आरोपीच्या प्रत्येक हालचालीवर बारीक नजर ठेवली.

आरोपी अरुण ढेपले हा सुरुवातीला 'मी नाही त्यातला' असा बनाव करत पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न करत होता. पण निफाड पोलिसांच्या धारदार चौकशीसमोर त्याचे सगळे डाव कोसळले. पोलिसांनी मानसिक दबाव, तांत्रिक तपास आणि अचूक निरीक्षण यांचा जबरदस्त संगम साधत आरोपीला कोंडीत पकडलं.

गुन्ह्याची कबुली देताना आरोपीने थरकाप उडवणारा खुलासा केला - रंभाबाई काळे यांचा गळा आवळून खून केल्यानंतर मृतदेह पोत्यात कोंबला, त्यात दगड भरले आणि देवपूर रोडलगतच्या पडक्या विहिरीत फेकून दिला! इतकंच नव्हे तर गुन्हा पचवण्यासाठी विष प्राशन करून स्वतःला वाचवण्याचा केविलवाणा प्रयत्नही केला.

या संपूर्ण प्रकरणात निफाड पोलीस कर्मचारी नितीन सांगळे, मनीषा गायकवाड, संगीता जाधव, धनंजय जाधव, अरविंद ढवळे, धनंजय बैरागी, विनोद जाधव, राजेंद्र दरोडे, सागर सानप, सुधाकर चव्हाणके यांनी जीव तोडून काम करत तपासाला निर्णायक वळण दिलं.

निफाड पोलिसांनी केवळ खून उघड केला नाही, तर थंड डोक्याने रचलेल्या या क्रूर कटाचा चक्काचूर करत आरोपीला कायद्याच्या कचाट्यात ओढलं शहर हादरलं, पण पोलिसांची धडाडी पुन्हा एकदा सिद्ध झाली!

# न्यू सातारा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट पॉलिटेक्निकल येथे टेक्नो स्पेक्ट्रम २०२६ उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : न्यू सातारा समूह मुंबई संचलित न्यू सातारा इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकल येथे न्यू सातारा समूहाचे संस्थापक अध्यक्ष माननीय राजाराम ( नाना )महादेव निकम. यांच्या संकल्पनेतून कॉलेजचे प्राचार्य विक्रम लोंढे सर यांच्या मार्गदर्शनाखाली, विद्यार्थ्यांच्या संशोधन ३२ व प्रतिभा शक्ती चालना मिळवण्यासाठी टेक्नो स्पेक्ट्रम २०२६ या टेक्निकल इन्वेस्ट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अविनाश डी सपकाळ सर, विभाग प्रमुख मेकॅनिकल विभाग दिन रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभाग हे उपस्थित होते प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी संस्था प्रतिनिधी ज्ञानेश्वर हेडगे साहेब, कॉलेज प्राचार्य विक्रम लोंढे सर ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफ ऑफिसर प्राध्यापक विशाल बाळसर सर्व विभाग प्रमुख शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते या कार्यक्रमांमध्ये प्रोजेक्ट कॉम्प्लिकेशन पेपर प्रेझेंटेशन पीपीटी मेकिंग अँड प्रोडक्शन कॉम्पिटिशन गेमिंग कॉम्पिटिशन कोडींग कॉम्पिटिशन यांचा समावेश होता प्रोजेक्ट कॉम्पिटिशन या स्पर्धेमध्ये बारस्कर साक्षी खटके सानिका देते तेजस्वी कांबळे दिशा या विजेच्या ठरल्या तर गायकवाड मंगेश काळे, चैतन्य व कनेरकर संस्कृती, सक्ती गायत्री कांबळे अनुष्का भंडारी वैष्णवी हे उपयोगी येथे ठरल्या पेपर प्रतिष्ठान कॉम्पिटिशन यामध्ये जाधव अंकिता या विजेते ठरल्या तर शिवाय साळुंखे हे उपविजेती ठरले . क्रॅडबॉर या स्पर्धेमध्ये विजय दीपक चव्हाण, याने प्रथम क्रमांक मिळवला तर ओंकार कंगळे व संस्कार राऊत या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. क्विज कॉम्पिटिशन या पवार , पायल विजेती ठरली पीपीटी मेकिंग अँड प्रेजेंटेशन कॉम्पिटिशन या स्पर्धेमध्ये यशराज देशमुख व शुभम वाघमारे, हे विजेते ठरले. श्रुती धोनी उपविजेते ठरले. मेकिंग कॉम्पिटिशन या प्रकारामध्ये.

??????????????

# बोरी उमरगे येथे गुड्डापूर धानम्मा देवी महापुराण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील श्री क्षेत्र बोरी उमरगे येथील दक्षिणमुखी जागृत जय हनुमान देवस्थान यात्रा महोत्सव निमित्त श्री.म.नी.प्र.मृतंजय महास्वामीजी सिद्धाश्रम वीरक्त मठ मैंदर्गी यांच्या रसाळ अमृतवाणीने श्री क्षेत्र गुड्डापूर धानम्मा देवी यांच्या जीवनचरित्रावर आधारीत महापुराण, प्रवचन कार्यक्रम सह देशभक्ती कार्यक्रम आयोजित केली आहेत.

प्रति वर्षाप्रमाणे यंदाही जय भारत माता सेवा समिती राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात श्री हवा मल्लिनाथ बहुउद्देशीय समाजसेवी संस्था वतीने श्री-क्षेत्र गुड्डापूर धानम्मा देवी जीवनचरित्रावर सलग आठ दिवस श्री.म.नी. प्र. मृतंजय महास्वामीजी सिद्धाश्रम वीरक्त मठ मैंदर्गी यांच्या रसाळवणीने व शांतकुमार गवई हिरे सावळगी यांचा संगीतसेवा तसेच तबलावादक दयानंद बडगेरी सिंदगी यांच्या तबला साथसंगतीने महापुराण प्रवचन कार्यक्रम होणार असून हणमंत च. बिराजदार यांच्या कडून बसवण्णा सेवा तर लक्ष्मीकांत बिराजदार, सातप्पा तेलुणगी यांच्याकडून सभा संचालन व सूत्रसंचालन सेवा होणार आहे.श्री जय हनुमान मंदिर पटांगणात श्री राम नवमी ते श्री हनुमान जन्मोत्सव पर्यंत २६ मार्च ते २ एप्रिल पर्यंत सलग आठ दिवस दररोज संध्याकाळी ७ ते रात्री १० पर्यंत महापुराण प्रवचन कार्यक्रम होणार आहे.

# वागदरीत गुढीपाडवा पट वाढवा प्रवेश दिंडी : विद्यार्थांनी उभारलेल्या प्रवेश गुढीचे केले घरोघरी पूजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड :

वागदरी तालुका तुळजापूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने गुढी पाडव्याच्या निमित्ताने गुढी पाडवा जिल्हा परिषद शाळेतील प्रवेश वाढवा हा उपक्रम राबविण्यात आला असून या निमित्ताने विद्यार्थ्यांनी उभारलेल्या प्रवेश गुढीसह गावातील मुख्य रस्त्यावरून टाळ मृदंगाच्या गजरात हलगीच्या निनादात लेझीम पथकासह प्रवेश दिंडी काढण्यात आली या प्रसंगी विद्यार्थ्यांनी उभारलेल्या गुढीचे पालकांनी घरोघरी पूजन करून या प्रवेश दिंडीचे स्वागत केले.

सध्या पालकांत इंग्लिश मीडियम स्कूलचे आकर्षण वाढले असून त्यामुळे गावोगावी जिल्हा परिषद प्राथमिक शाळाची विद्यार्थी पट.संख्या झपाट्याने घटत असल्याचे दिसून येत आहे. ही एक चिंतेची बाब असून या विषयी जाणीव जागृती करण्याच्या उद्देशाने गुढीपाडव्याच्या निमित्ताने गुढी पाडवा पट वाढवा हा उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक बी.बी. सगर यांच्या मार्गदर्शकाखाली वागदरी येथे राबविण्यात आला.





येथील जि.प.प्राथमिक शाळा वागदरी येथे गुढीपाडवा प्रवेश वाढवा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये इयत्ता पहिलीत नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम घेण्यात आले.

प्रथमतः गावच्या सरपंच सौ. तेजाबाई मिटकर, माजी उपसरपंच दत्ता सुरवसे, भाजपा तालुका उपाध्यक्ष किशोर सुरवसे, सेवा निवृत्त शिक्षक शिवाजी मिटकर गुरुजी, शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा कोमल झेंडारे, सीआरपी विद्या बिराजदार, जिप्सी गाडी मालक जितेंद्र पाटील, दत्ताभाऊ पाटील, सर्व शिक्षक वृंद अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा कार्यकर्त्या, ग्रामस्थ, पालक यांच्या उपस्थितीत सावित्री माईच्या फोटोचे पूजन करून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

तदनंतर इ.पहिलीत नवीन प्रवेश घेतलेल्या मुलांना साखरेचा हार ,फुलांचा हार, टोपी घालून त्यांचे औक्षण करण्यात आले.

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जिप्सी गाडी सजवून त्यामध्ये सर्व मुलांना बसवून वाजत गाजत ढोल, ताशा, हलगी, म्युझिक तसेच लेझीम पथक, भजनी मंडळ टाळाच्या गजरात संपूर्ण गावात प्रवेश दिंडी काढण्यात आली.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी उभारलेल्या प्रवेश वाढवा गुढीचे ग्रामस्थांनी चौका चौकात पूजन केले.नवीन प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याच्या दारी जाऊन त्यांच्या पावलाचे ठसे घेऊन पूजा करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषद शाळेचे महत्व सर्व ग्रामस्थांना पटवून देण्यात आले.आणि आजच आपल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश जिल्हा परिषदेच्या शाळेत निश्चित करा असे सर्व ग्रामस्थांना आवाहन करण्यात आले. यावेळी रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस. के. गायकवाड सह विद्यार्थी पालक ग्रामस्थ मोठ्या संख्येंने उपस्थित होते.